ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

# मुस्लिम लेखकांच्या मराठी कथा लेखनातील सामाजिकता

**रोहित वाडिले**

संशोधक विद्यार्थी,

*शिरपूर.*

मराठी साहित्य हे व्यापक स्वरुपाचे साहित्य आहे. आज मराठी साहित्याने स्वतःचे व्यापक स्वरुप धारण केलेले आहे. या साहित्याची मुहुर्तमेढ आठव्या नवव्या शतका पासून रोवली गेली. या साहित्य विश्वात अनेक प्रवाहांनी आपला समावेश करुन आपले नाते या साहित्याशी जोडलेले आहे. अनेक साहित्य प्रवाह मराठी साहित्याचा भाग म्हणून पुढे आलेले आहेत. प्रामुख्याने स्वातंत्र्योत्तर काळामध्ये मार्क्सवादी साहित्य, आंबेडकरवादी साहित्य ग्रामिण साहित्य, अस्तित्ववादी साहित्य, जनवादी साहित्य, आदिवासी साहित्य, ख्रिस्ती साहित्य, जैन साहित्य इत्यादी प्रवाह आहेत. साहित्यामध्ये निर्माण होणारे नवे प्रवाह त्या साहित्य विश्वाला समृध्द करीत असतात आणि त्या साहित्यातील चैतन्य टिकवून ठेवण्याचे सामर्थ्य अशा प्रवाहात प्रामुख्याने दिसून येते. गेल्या तीस चाळीस वर्षात मराठी साहित्याची कक्षा अधिक रुंदावली आहे. समाजातील विविध घटक आपल्या भावनांना साहित्याच्या परिघावर आणू लागले आहेत. विविध जातीचे धर्माचे लोक आपल्या व्यथा, वेदना, दुःख, सुख यांची मांडणी साहित्यातून करु लागले आहेत. आज मराठी साहित्यामध्ये दलित, ग्रामिण साहित्या बरोबरच आदिवासी, ख्रिस्ती, जैन, कोकणी इत्यादी समाज घटक आपल्या कुवती प्रमाणे साहित्याची निर्माती करु लागले आहेत. या मध्ये मुस्लिम लेखकांनी लिहिलेल्या मुस्लिम मराठी साहित्याची भर पडलेली आहे.

**Copyright © 2023 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

मराठी साहित्यात कथेने व्यापलेले क्षेत्र खूपच व्यापक आहे. दोनशे वर्षाच्या काळात मराठी कथा वेगवेगळ्या समाज घटकांच्या अंतरंगाचे प्रतिनिधीत्व करतांना दिसून येते. विशेषतः बहुसंख्यक समाजाचे विविधांगी चित्रण कपेतून प्राधान्याने होतांना दिसून येते. नव्वदोत्तरी कालखंडात बदललेल्या मानसिकतेचा आणि वैचारिकतेचा समाचार मुस्लिम लेखकांनी घेतलेला दिसतो. नव्या दमाच्या मुस्लिम लेखकांनी त्यांची व्यथा मोठ्या प्रमाणावर आक्रमकपणे मांडलेली दिसते. १९८९-१९९० च्या सुमारास सुरु झालेली मुस्लिम लेखकांची चळवळ स्वातंत्र्य मिळवून पन्नास वर्षे

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

झाली तरी त्याचा भौतिक परिस्थितीत फारसा न पडलेला फरक, शिक्षणाचा अभाव, बेकारी, उपजिविकेच्या साधनांची कमतरता, दारिद्र्य व निरक्षरता ही मुस्लिम समाजातील गंभीर प्रश्नांची नाणीय मुस्लिम लेखकांना झालेली दिसते. १९९० नंतर मुस्लिम लेखकांनी मुसलमान समाजाच्या व्यथा नव्या परिस्थितीच्या संदर्भात आणि जातीयदंगलींच्या संदर्भात मांडायला सुरुवात केली. तसेच मराठी साहित्यातील नकारात्मक चित्रणा विरुध्द आवाज उठवायला सुरुवात केलेली दिसते. या सर्व परिस्थितीच्या संदर्भात संघटीतरित्या सर्व मुस्लिम लेखकांनी एकत्रित आणण्याची गरज होती. त्यातून मुसलमानांचे आर्थिक व सामाजिक प्रश्न त्यांच्यावर होणारे अन्याय व अत्याचार, मुस्लिम महिलांचे प्रश्न तसेच इतर धर्मियां बरोबर सहजिवनाचे संबंध ही त्यांच्या लेखनात मांडले आहेत. अनेक • मुस्लिम लेखकांनी त्यांच्या अभिव्यक्तीचे साधन हे कथा वाङमयला मानले आहे.

मुस्लिम मराठी कथेला खऱ्या अर्थाने १९३७ साली प्रारंभ झाला. कथा वाङमयाला प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या सत्यकथा मासिकात ऑक्टोबर १९३७ च्या अंकात म फारुख खान यांची गोषा' ही पहिली मुस्लिम मराठी कथा प्रकाशित झाली. त्यानंतर सिद्दीकी गुलाम मोहम्मद यांच्या "पकरजामा" व "चार रिकामटेकडे" या दोन कथा सत्यकथेच्या १९४५ च्या अंकात प्रकाशित झाल्या. म्हणजेच मराठी नवकथाकारांनी कथा लिला सुरुवात करण्यापूर्वीच मुस्लिम कथाकारांनी कथा लिहायला सुरुवात केल्याचे जाणवते. स्वातंत्र्योत्तर काळात हमीद दलवाई प्रा.डा.यु. म. पठाण, वशीर मुजावर, मुबारक शेख, जावेद कुरेशी, राजन खान, रफिक सूरज सलिम शेख एहतेशाम देशमुख, रजिया सुलताना, के. एच. बेन्नूर, शिकलगार आशराबी इत्यादी कथाकारांनी कथा वाङ्मयात मौलिक भर घातलेली आहे.

मराठी साहित्यात डॉ. यु. म. पठाण एक सर्जनशील लेखक, समीक्षक, वक्ता, कथाकार आणि विचारवंत म्हणून परिचयाचे आहेत. त्यांच्या 'जितराव' हा कथा संग्रह १९९२ साली प्रकाशित झाला, जितराब म्हणजे जानवर माणसाच्या जिवनापेक्षाही जनावराचे जीवन चांगले आहे अशी भावना जितराव या कथेतील नायक रसूल व्यक्त करतो. रात्रदिवस काबाडकष्ट करुन त्याला आपल्या मुलाबाळांचा उदरनिर्वाह करता येत नाही. तेंव्हा तो खिन्न मनाने म्हणतो की, कयामतच्या दिवशी जे आपल्या वाटेला येईल ते आपण रोजच येथे भोगत आहोत. आधार ही कथा मुस्लिमांच्या भावविश्वाचे विश्लेषण करणारी कथा आहे. या कथेतील गफूर आणि रहिम हे पारंपारीक व्यवसायात गुरफटत जातात त्यांना आधुनिक व्यवसायाचे कसब नसल्यामुळे जीवनात जे हाल सोसावे लागते त्याचे चित्रण डॉ. पठाणांनी अत्यंत रेखीय पध्दतीने केलेले आहे.

जावेद कुरेशी यांच्या औरंगजेब आणि जोशी' हा कथासंग्रह १९९२ साली प्रकाशित झाला. 'जीन' या कथेत रशीदा ही लग्न करायला तयार नसते पण तिच्या घरच्या परिस्थिती फार हलाखीची होती. ती एक दिवस गावातील दग्यांत जाते तेथे तिच्याच वयाच्या नसीमाच्या अंगी कस्थानाचा जीन येतो. हे सर्व पाहून ती गरीबोडे लाचार आणि अगतिक होवून आपल्यापेक्षा वयाने फार मोठ्या पुरुषाशी लग्न करायला तयार होते. कुरेशी यांची कथा मुसलमानांच्या जीवनातला जळजळीत अनुभव व्यक्त करते. हकीकत या कथेतील विषय हा क्रिकेट सारख्या संवेदनशील विषयावर आधारीत आहे.

आपल्या देशात धर्मापेक्षा जास्त महत्व क्रिकेटला दिले जाते. भारत आणि पाकिस्तानचा क्रिकेटचा सामना असला की, संवेदनशीलतेची सीमाच पार होते. या कथेतील महेमुद हा मॅच पाहत होता. भारताने पाकिस्तान विरुध्दची मॅच जिंकली तेंव्हा वाजूचा देशपांडे महेमुदला म्हणतो की, आज तुने नमाज पढली नसावी. महेमूद गरीबीत राहणारा, त्याला पाकिस्तान कुठे आहे हेही माहित नाही, म्हणून तो आपल्या बाबना विचारतो असे कोट्यावधी मुसलमान असतील की, त्यांचे पाकिस्तानशी काहीही घेणे देणे नसेल. क्रिकेटच्या नावाने मुस्लिमांवर शंका घेतली जाते, त्यांच्या अस्तित्वावर व निष्ठेवर प्रश्न निर्माण केले जातात. याचे प्रत्ययकारी चित्र जावेद कुरेशी करतात.

मुबारक शेख यांचा 'नमाज आणि महाआरती हा पहिला कथासंग्रह १९९३ साली प्रकाशित झाला. कत्तल या कथेव्दारे मुस्लिम समाजातील अज्ञानावर मुबारक शेख यांनी ताशेरे ओढलेले आहेत. अज्ञानामुळे मुस्लिम समाज स्वतःच स्वतःची कत्तर ओढवून घेत आहे. याचा वेध घेणारी ही कथा आहे. लालसा या कथेत गरीबीमुळे आपल्या पोटाच्या मुलीचा मृत्यू कसा होतो व डॉक्टर माणसापेक्षा कुत्र्याला कसे महत्व देतात याचे मार्मिक चित्रण या कथेत मुबारक शेखांनी केलेले आहे. फेसला या कथेत मुबारक शेख यांनी अस्मा आणि इरफानची कथा। गुंफलेली आहे. अस्मा हो सुशिक्षित मुस्लिम स्त्री होती. इरफान पदवीधर होता पण तो नोकरीच्या फंद्यात न पडता चमड्याचा व्यवसाय करीत होता.

महाराष्ट्रातील मुस्लिम समाज अज्ञानी, दरिद्री व्यसनामुळे कर्जबाजारी आहे. त्याचे जीवन कसे घुटमळते तो गरीबी व लाचारीमुळे कसा लुळापांगळा झालेला आहे आणि त्याला वास्तव जीवन संघर्षाला कसे सामोरे जावे लागते याचे भान मुस्लिम मराठी कथाकारांनी ठेवलेले आहे. त्याच बरोबर हिंदु मुस्लिमांचे संघर्ष, दंगल, धर्मांधता मुस्लिमेत्तर समाजाशीसंबंध अशा सर्व घटना डोळ्यासमोर ठेऊन या कथकारांनी आपल्या कथा लिहिलेल्या आहेत. सामाजिक व्यवस्थेने ज्यांची सामाजिक आर्थिक धार्मिक, राजकिय आणि शैक्षणिकदृष्ट्या कोंडी झालेली कलेतून दिसते. त्यांच्या कथांमधील व्यक्तीरेखा, वेदना, विद्रोह नकार घेऊन समाज व्यवस्थेशी भांडतात आणि इतर भारतीयां प्रमाणेच भारत आमचाही देश आहे असे ठासून सांगतात. आम्हालाही इतरां प्रमाणे माणूस म्हणून जगण्याचा हक्क आहे. हा निर्धार व्यक्त करतात. अशा मुस्लिम व्यक्तीरेखाना मराठी कथेत स्वतःचा वेगळा ठसा उमटवितात.

**संदर्भ ग्रंथ:**

१. नसीम देशमुख- मुस्लिम मराठी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा

२. अक्रम पठाण मुस्लिम मराठी साहित्य

३. जुल्फी शेख - नवे प्रवाह नवे स्वरुप

४. फ. म. शहाजिंदे- मुस्लिम मराठी साहित्य प्रेरणा आणि स्वरुप (संपादन)

५. फ.म. शहाजिंदे मुस्लिम मराठी साहित्य परंपरा स्वरूप आणि लेखकसूची

*Cite this Article:*

Vadile R. (2023). ***मुस्लिम लेखकांच्या मराठी कथा लेखनातील सामाजिकता***. In Electronic International Interdisciplinary Research Journal: Vol. XII (Number VI, pp. 354–356). Zenodo. https://doi.org/10.5281/zenodo.10464706